|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**जा.क्र.उमवि/5/ 435/2017** **दिनांक: 29/08/2017**

# ***कालमर्यादा***

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/शिक्षक तथा
मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक/शिक्षक ......

**विषय:- संलग्नता विभागाच्या ऑनलाईन प्रणाली (OAASIS) मार्फत शिक्षकांची माहिती भरणेबाबत/यापूर्वी भरलेली माहिती अद्ययावत करणेबाबत......**

महोदय/महोदया,

वरील विषयान्वये कळविण्यांत येते की, विद्यापीठाच्या संलग्नता विभागाचे कार्यालयीन कामकाज संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने सुरु असून सदर प्रक्रियेव्दारे संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील कार्यरत असणा-या संबंधित शिक्षकांची (मा.प्राचार्य/मा.संचालक यांचेसह) माहिती ऑनलाईन प्रणालीव्दारे वेळोवेळी भरुन अद्ययावत करुन घेण्यांत आलेली आहे.

संलग्नता विभागातर्फे माहे सप्टेंबर,2017 मध्ये शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता नवीन विषय/अभ्यासक्रम/नवीन विद्याशाखा/अतिरिक्त तुकडी/विद्यार्थी संख्या वाढ/सेकंड शिफ्ट इत्यादि बाबींच्या विस्ताराचे तसेच संलग्नीकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, कायम संलग्नीकरण इत्यादिंचे प्रस्ताव शासनाकडील अंतिम निर्देशान्वये स्विकारण्यांत येणार असून, त्यादृष्टीने विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थेत कार्यरत असलेल्या संबंधित सर्व शिक्षकांची माहिती संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने भरुन घेणे बंधनकारक असून, तसेच यापूर्वी भरलेली माहिती अद्ययावत करणे, जे शिक्षक महाविद्यालय/परिसंस्था सोडून गेले अथवा सेवानिवृत्त झाले आणि त्यांचे ऐवजी नव्याने शिक्षक नियुक्त करण्यांत आले असतील, या प्रयोजनार्थ अचूक माहिती भरणेसाठी **महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेकरिता आणि शिक्षकांकरिता दिनांक 29/08/2017 ते 30*/09/2017 या कालावधीत** ऑनलाईन प्रणालीव्दारे संबंधितांसाठी माहिती भरणेसाठी Link सुरु करण्यांत आलेली आहे. **ऑनलाईन प्रणालीव्दारे यापूर्वी भरलेला संपूर्ण डेटा हा ऑनलाईन स्क्रिनवर उपलब्ध असून त्यातील माहिती अद्ययावत करणेसाठी आपणांस त्या-त्या स्क्रिनवरील त्या-त्या विंडोसमोर Edit/Delete ची सोय उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. संबंधितांना त्याप्रमाणे सदर माहिती आवश्यकतेनुसार अद्ययावत करता येईल**. सोबत आवश्यक त्या guidelines देण्यांत आलेल्या असून online help देखील उपलब्ध केलेली आहे. मात्र **सदरची Online Link दिनांक 30*/09/2017 रोजी सायंकाळी 5.00 वाजता बंद होईल, याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी**.

कृपया वरीलबाबत आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील संबंधित शिक्षकांना ऑनलाईन प्रणालीव्दारे त्यांची अनुषंगिक माहिती भरणेबाबत/अद्ययावत करणेबाबत त्वरीत अवगत करावे, जेणेकरुन संबंधितांना त्यांची माहिती विहीत मुदतीत भरता येईल. आपणांस असेही विदीत करण्यांत येते की, संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच संबंधित शिक्षकांशी होणारा संपूर्ण पत्रव्यवहार हा ऑनलाईन प्रणालीमार्फतच होणार असल्यामुळे शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता स्विकारण्यांत येणारे प्रस्ताव व त्यापुढील अनुषंगिक होणा-या कार्यवाहीसदेखील कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये, त्यासाठी संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था/संबंधित शिक्षकांनी सदरची माहिती भरणे यासह यापूर्वी भरलेली माहितीदेखील अद्ययावत करणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन, आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील संबंधित शिक्षकांकडून सदरची माहिती विहीत मुदतीत भरली जाईल याबाबत कृपया गांभीर्यांने नोंद घ्यावी, ही विनंती. सदर माहिती भरतांना काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास, सदर बाबीचे निराकरण करणेसाठी **7722065281/82** या Helpline वर विद्यापीठाच्या कार्यालयीन दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 या वेळेत संपर्क साधावा.

**म.कळावे,**

*** 30सप्टेंबर 2017 रोजी विजयादशमी (दसरा) निमित्त शासकिय सुटी आहे,**
**याची नोंद घ्यावी**

आपला विश्वासू,
**Sd/-**
उपकुलसचिव,
संलग्नता विभाग

सोबत:- आवश्यक त्या Guidelines.

-: **Guidelines** :-

1] उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर Homepage वरील "BCUD" विभागावर Click केल्यानंतर "Affiliation" वर pointer ठेवून त्यासमोर येणा-या "Online Affiliation" या Link वर click करुन महाविद्यालयाने Login व password टाकून नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांची माहिती भरावी. त्यासाठी महाविद्यालयास/मान्यताप्राप्त परिसंस्थेस त्यांच्या Login ID मध्ये Manage Teaching Staff या लिंकमध्ये Add New ही लिंक देण्यांत आलेली असून आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेत जे नव्याने शिक्षक नेमले गेले असतील अथवा ज्या शिक्षकांची नांवे अद्याप त्यात समाविष्ट केलेली नसतील, अशा शिक्षकांची नांवे Add New या लिंकव्दारे समाविष्ट करण्यांत यावीत. महाविद्यालयाने अशा शिक्षकांची माहिती भरल्यानंतरच नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे त्यांचा Login ID व Password उपलब्ध होईल व त्यानंतरच संबंधित शिक्षक त्यांची तपशिलवार माहिती भरु शकतील. अशा शिक्षकांनी वरीलप्रमाणे त्यांचा Login व password टाकून उपलब्ध Link मधील त्या-त्या मुद्यांसंदर्भातील परिपूर्ण माहिती भरावी. तसेच त्यांचा Login ID व password लक्षात ठेवावा, तसेच आठवड्यातून एकदा आणि मोबाईलव्दारे येणा-या SMS प्रमाणे Login करावे.

2] महाविद्यालयाने/मान्यताप्राप्त परिसंस्थेने Manage Teaching Staff या लिंकव्दारे जे शिक्षक महाविद्यालय/परिसंस्था सोडून गेले असतील अथवा सेवानिवृत्त झाले असतील त्यांची नांवे आपल्या महाविद्यालयातून/परिसंस्थेच्या यादीतून Remove from College List या लिंकव्दारे कमी करण्यांत यावीत. तसेच संबंधित शिक्षकास ज्या विषयाच्या कार्यभारामध्ये दाखविले जाईल त्या विषयाचे नांव Edit लिंकव्दारे अद्ययावत करण्यांत यावे. सदर विषयाचे नांव प्रत्येक शिक्षकाच्या बाबतीत भरणे अनिवार्य असून त्याशिवाय Workload बाबतची माहिती व्यवस्थितरित्या भरली जाणार नाही. महाविद्यालयाने सदरची माहिती अद्ययावत केल्याशिवाय महाविद्यालय/परिसंस्था सोडून गेलेले शिक्षक त्यांची माहिती भरु शकणार नाहीत/अद्ययावत करु शकणार नाहीत. तरी सदर बाबीची नोंद घेऊन त्वरीत माहिती अद्ययावत करावी.

3] एखाद्या शिक्षकाने, ते ज्या महाविद्यालयात कार्यरत होते, त्यावेळी ऑनलाईन प्रणालीमार्फत त्यांनी यापूर्वी त्यांची माहिती भरलेली असल्यास व नंतर ते शिक्षक सदर महाविद्यालय सोडून दुस-या महाविद्यालयात रुजू झाले असतील, तर त्यांनी नव्याने माहिती भरण्याची आवश्यकता नाही. त्यांनी यासंदर्भात support@oaasisnmu.org या मेल आयडीवर त्याबाबत मेल करावा, म्हणजे सदर शिक्षकाने यापूर्वी भरलेली माहिती ते आज ज्या महाविद्यालयात कार्यरत आहेत तेथे वर्ग करण्यांत येऊन सदर शिक्षकास त्यात काही बदल/दुरुस्ती वा सदर माहिती अद्ययावत करावयाची असल्यास करता येऊ शकेल. सदर मेल करतांना संबंधित शिक्षकाने त्यांचा OAASIS चा Login ID, पूर्वीच्या College/Institute चा Login ID आणि सध्या कार्यरत असलेल्या College/Institute चा Login ID नमूद करणे आवश्यक आहे.

4] वरीलप्रमाणे शिक्षकांनी (मा.प्राचार्य/मा.संचालक यांचेसह) ऑनलाईन पध्दतीने आपली माहिती भरण्यापूर्वी आपला ई-मेल आयडी, शैक्षणिक पात्रतेसंदर्भातील माहिती, विद्यापीठाच्या मान्यता पत्राच्या प्रती (संगणकात स्कॅन केलेल्या), प्रथम नियुक्तीचा दिनांक, आपण हजर असलेल्या/ आयोजीत केलेल्या/पेपर सादरीकरण केलेल्या विविध workshop/symposium/ conference, विविध वित्तीय संस्थांकडून प्रोजेक्टसाठी आपणांस मिळालेल्या रकमेसह प्रोजेक्ट, आपण प्रसिध्द केलेली संशोधन पुस्तिका (research papers), आपण लिहिलेली पुस्तके, आपण शिकवित असलेले विषय,आपला वर्ग व विषयनिहाय कार्यभार इत्यादि शैक्षणिक बाबींची माहिती सोबत ठेवावी, जेणेकरुन आपणांस त्वरीत सदर माहिती भरणे सोईचे होईल.

5] संलग्नता विभागामार्फत नियुक्त केल्या जाणा-या विविध समितींमध्ये सदर शिक्षकांचा अंतर्भाव असणार असून समिती सदस्यांना व महाविद्यालयांना ऑनलाईन पध्दतीने तयार झालेल्या Login वरच ऑनलाईन पध्दतीने पत्र पाठविले जाणार आहे, तसेच महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांची संख्यासुध्दा याच कार्यपध्दतीतून बघीतली जाणार आहे. त्यामुळे महाविद्यालयात/परिसंस्थेमध्ये कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकांनी (मा.प्राचार्य/मा.संचालक यांचेसह) त्यांची माहिती वरीलप्रमाणे "**Online Affiliation**" या Link वर विहीत कालावधीत भरणे आवश्यक आहे. सदर Link दिनांक 30*/09/2017 रोजी सायंकाळी 5.00 वाजता बंद होईल, तरी सर्व संबंधितांना याबाबत सूचित करुन लवकरात लवकर अनुषंगिक माहिती भरण्यास प्रवृत्त करावे.

6] ऑनलाईन प्रणालीव्दारे यापूर्वी भरलेला संपूर्ण डेटा आपणांस ऑनलाईन स्क्रिनवर उपलब्ध असून त्यासमोरची माहिती अद्ययावत करणेसाठी आपणांस त्या-त्या स्क्रिनवरील त्या-त्या विंडोसमोर Edit/Delete ची सोय उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

*** 30सप्टेंबर 2017 रोजी विजयादशमी (दसरा) निमित्त शासकिय सुटी आहे, याची नोंद घ्यावी**

**Sd/-**
उपकुलसचिव,
(संलग्नता विभाग)